सत्यमेव जयते
पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँटी करप्शन औरंगाबाद

# प्रसिध्दी पत्रक

आलोसे श्री राजेंद्र उत्तमराव खंडागळे, वय ५२ वर्ष धंदा - सहाय्यक फौजदार, पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर हे ६,०००/- रुपयाची लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री राजेंद्र उत्तमराव खंडागळे, वय ५२ वर्ष धंदा - नौकरी, सहाय्यक फौजदार, पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर रा. प्लॉट नं. १४१, वानखेडे नगर, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारिख व ठिकाण | :- | दिनांक १५/०५/२०१८ रोजी पोलीस स्टेशन छावणी मध्ये |
| लाचेची रक्कम | :- | ६,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई न करण्याठी व घेतलेला मोबाईल परत देण्यासाठी १०,०००/- रूपये लाचेची मागणी |

यातील तक्रारदार हे खाजगी व्यवसाय नौकरी करतात. तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस ठाणे छावणी मध्ये तक्रार असल्याने आलोसे श्री राजेंद उत्तमराव खंडागळे, सफौ यांनी पोलीस स्टेशन येथे भेटण्यास बोलविले. तक्रारदार पोलीस स्टेशनला आल्यानंतर आलोसे यांनी सांगीतले की, "तुमच्या विरुध्द तक्रार अर्जाची मी चौकशी करत असुन कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करायची नसले तर मला १०,०००/- रुपये घेवुन ये असे म्हणुन माझ्या जवळील असलेला मोबाईल ठेवुन घेतला. त्यावेळी तक्रारदार यांची आलोसे श्री राजेंद आमराव खंडागळे, सफौ, पोलीस स्टेशन छावणी औरंगाबाद शहर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १५/०५/२०१८ रोजी आलोसे श्री राजेंद उत्तमराव खंडागळे, सफौ यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, श्री. राजेंद उत्तमराव खंडागळे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रु. लाचेची मागणी करुन, तडजोडी अंती ६,०००/- रु. लाचेची मागणी केली. त्यावरुन आज रोजी दिनांक १५/०५/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, आलोसे श्री राजेंद्र उत्तमराव खंडागळे, वय ५२ वर्ष धंदा - नौकरी, सहाय्यक फौजदार, पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर रा. प्लॉट नं. १४१, वानखेडे नगर, औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारासमक्ष ६,०००/- रुपये लाचेची रक्कम पोलीस स्टेशन छावणी, औरंगाबाद शहर येथे स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरिकांची भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.

फोन नं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्र. १०६४
Mail ID :- dyspacbaurangabad@mahapolice.gov.in

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.